**कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर**
**स्थायी समिती सभा क्र.०५ सन २०१७/१८**

शुक्रवार, दिनांक ०१/०९/२०१७

==================== ◎ ◎ ◎ ◎ ◎ ◎ ==================

# <u>कार्यवृत्तांत</u>

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या, स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ०१/०९/२०१७ इ.रोजी दुपारी ०१.०० वाजता जिल्हा परिषदेच्या स्वर्गीय वसंतराव नाईक सभागृहात आयोजीत केली होती. सदर सभेचा कार्यवृतांत खालील प्रमाणे-

**<u>हजर सदस्य :-</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. शौमिका अमल महाडिक | अध्यक्ष तथा सभापती स्थायी समिती |
| २. | मा.सर्जेराव ज्ञानदेव पाटील | सदस्य |
| ३. | मा.सर्जेराव बंडू पाटील (पेरीडकर) | सदस्य |
| ४. | मा.अंबरिषसिंह संजय घाटगे | सदस्य |
| ५. | मा.शुभांगी रामचंद्र शिंदे | सदस्य |
| ६. | मा.विशांत सुरेश महापुरे | सदस्य |
| ७. | मा.राहुल पांडुरंग पाटील | सदस्य |
| ८. | मा.जयवंत गुंडोपंत शिंपी | सदस्य |
| ९. | मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले | सदस्य |
| १०. | मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक निंबाळकर | सदस्य |
| ११. | मा.राहुल प्रकाश आवाडे | सदस्य |
| १२. | मा.कल्लाप्पा सतुराम भोगन | सदस्य |

येणेप्रमाणे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष मा.पदाधिकारी, मा.समिती सदस्य व मा.प्रकल्प संचालक तसेच संबधीत खाते प्रमुख, अधिकारी उपस्थित झाले व सभा कामकाजास सुरवात झाली.

**मा.सभापती (शिक्षण व अर्थ) :-** आजच्या स्थायी समिती सभेस उपस्थित असलेल्या सर्व मा.पदाधिकारी, मा.समिती सदस्य, मा.अधिकारी व खाते प्रमुख, कर्मचारी वर्ग यासर्वांचे स्वागत करतो आजच्या स्थायी सभेत दु:खवटयाचे व अभिनंदनाचे ठराव असल्यास घेणेत यावेत.

**मा.अरुणराव इंगवले :-** मुंबई येथील भेंडीबाजार परीसरातील ११७ वर्षे जुनी सहा मजली इमारत कोसळून २४ जणांचा मृत्यु झाला आहे तसेच डॉ.भीमराव गस्ती (वय ७०) यांचे मंगळवार दिनांक ०८/०८/२०१७ इ.रोजी निधन झाले आहे.या बाबत दुखवटयाचा ठराव घेवुया व माकडवाला वसाहतीमध्ये दारुच्या नशेत मुलाने त्याच्या आईची निघृण हत्या केले बाबत निषेधाचा ठराव घेवुया.

**मा.अध्यक्ष:-** माजी आमदार मा.के.पी.पाटील यांच्या कन्या सौ.कृष्णगंधा संग्रामसिंह सुर्यवंशी यांचे अल्पशा आजाराने दि.३१/०८/२०१७ रोजी दु:खद निधन झाले आहे या बाबत दुखवटयाचा ठराव घेवुया.

**मा.सभापती (म.बा.क.):-** शिरोळ जिल्हा परिषद मतदार संघाचे सदस्य मा.दलितमित्र डॉ.अशोकराव कोंडिबा माने (बापू) यांच्या मातोश्री श्रीम.हौसाबाई कोंडिबा माने यांचे वृध्दापकाळाने दिनांक २२/०८/२०१७ इ.रोजी निधन झाले आहे या बाबत दुखवटयाचा ठराव घेवूया.

**<u>दुखवटयाचा ठराव:-</u>**

**ठराव क्र.:- १२८** **दिनांक :-०१/०९/२०१७**

मुंबई येथील भेंडीबाजार परीसरातील ११७ वर्षे जुनी सहा मजली इमारत दि.३१/०८/२०१७ इ.रोजी कोसळली व त्यामध्ये २४ जणांचा मृत्यू झाला तर अनेक लोक गंभीररित्या जखमी झाले. हि घटना अंत्यत गंभीर व दु:खद असलेचे विषद करणेत आले. मृतात्म्यास सभागृहाच्यावतीने दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दाजंली वाहीली व सर्वानुमते दुखवटयाचा ठराव पारीत करणेत आला.

सुचक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.कलाप्पा सतुराम भोगण
ठराव सर्वानुमते मंजूर

**<u>दुखवटयाचा ठराव:-</u>**

**ठराव क्र.:- १२९** **दिनांक :-०१/०९/२०१७**

माजी आमदार मा.के.पी.पाटील यांच्या कन्या सौ.कृष्णगंधा संग्रामसिंह सुर्यवंशी यांचे वयाच्या ३० व्या वर्षी अल्पशा आजाराने दि.३१/०८/२०१७ रोजी दु:खद निधन झाले त्या बिद्री साखर कारखाण्याचे माजी संचालक श्री.सुरेशराव सुर्यवंशी यांच्या सुनबाई व बिद्री साखर कारखाण्याचे माजी उपाध्यक्ष श्री.सुनिलराज सुर्यवंशी यांच्या भावजय होत. कै.सौ.कृष्णगंधा संग्रामसिंह सुर्यवंशी यांना श्रध्दांजली वाहून सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.

सुचक :- मा.शौमिका अमल महाडिक
अनुमोदक :- मा.अंबरिषसिंह संजय घाटगे
ठराव सर्वानुमते मंजूर

**<u>दुखवटयाचा ठराव:-</u>**

**ठराव क्र. :- १३०** **दिनांक :- ०१/०९/२०१७**

शिरोळ जिल्हा परिषद मतदार संघाचे सदस्य मा.दलितमित्र डॉ.अशोकराव कोंडिबा माने (बापू) यांच्या मातोश्री श्रीम.हौसाबाई कोंडिबा माने यांचे वृध्दापकाळाने वयाच्या ९५ व्या वर्षी मंगळवार दिनांक २२/०८/२०१७ इ.रोजी दु:खद निधन झाले आहे. कै. हौसाबाई कोंडिबा माने यांना वयाच्या ८१ व्या वर्षी सिंधुताई सपकाळ यांच्या हस्ते आदर्श माता पुरस्काराने गौरविण्यात आले होते. याबाबत सभागृहाच्यावतीने कै. हौसाबाई कोंडिबा माने यांना श्रध्दांजली वाहून सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.

सुचक :- मा.शुभांगी रामचंद्र शिंदे
अनुमोदक :- मा.राजवर्धन रामराजे विठ्ठलराव नाईक - निंबाळकर
ठराव सर्वानुमते मंजूर

**<u>दुखवटयाचा ठराव:-</u>**

**ठराव क्र. :- १३१** **दिनांक :- ०१/०९/२०१७**

महाराष्ट्र - कर्नाटक सीमाभागातील हजारो बेरड, रामोशी, देवदासी यांच्यासाठी झटणारे "बेरड" "आक्रोश" कार डॉ.भीमराव गस्ती (वय ७०) यांचे मंगळवार दिनांक ०८/०८/२०१७ इ.रोजी कोल्हापूरातील खाजगी रुग्णालयात उपचारा दरम्यान दु:खद निधन झाले आहे. कै. डॉ.भीमराव गस्ती यांना त्यांच्या कामाबद्दलअनेक पुरस्कार मिळाले आहेत. सन २००७ मध्ये संत गाडगेबाबा पुरस्कार व सन २००९ मध्ये अंत्योदय पुरस्काराने त्यांना

सन्मानित करणेत आले होते. सभागृहाच्या वतीने कै. डॉ.भीमराव गस्ती यांना श्रध्दांजली वाहून सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.

सुचक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**<u>दुखवटयाचा ठराव:-</u>**

**ठराव क्र. :-१३२** **दिनांक :- ०१/०९/२०१७**

ताराराणी चौक कोल्हापूर येथील माकडवाला वसाहती मध्ये सुनील रामा कुचकोरवी (वय ३५) या मुलाने दारुच्या नशेत आईकडे पैसे मागितल्यानंतर ते न दिले कारणास्तव त्याची आई यलव्वा रामा कुचकोरवी (वय ७०) हिचा दिनांक २८/०८/२०१७ इ.रोजी धारदार शस्त्राने गळा चिरून निघृण खून करून मानवतेला काळीमा फासला आहे. या अमानवीय कृत्याचा तिव्र शव्दात सभागृहाने निषेध करून कोल्हापूर जिल्हा बार असोशिएशनने सदर आरोपीचे वकीलपत्र घेऊ नये याबाबत त्यांना कळवावे व आरोपीला मोठयात मोठी शिक्षा होणे बाबत सभागृहामध्ये चर्चा होऊन तशी मागणी केली व सभागृहाच्यावतीने दोन मिनिटे स्तब्धता पाळून मृतात्म्यास श्रध्दाजंली वाहीली व सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.

सुचक :- मा.अरुणराव जयसिंगराव इंगवले
अनुमोदक :- मा.जयवंत गुंडोपंत शिंपी
ठराव सर्वानुमते मंजूर

**मा.अरुणराव इंगवले :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील योजनेचा पाणी पुरवठा बंद असलेने या योजने मधिल गावांनी पैसे न भरलेने थकबाकी राहीली आहे. या योजनेचा पाणी पुरवठा बंद असून योजने मधिल तीन गावे आंदोलनाच्या तयारीत आहेत व त्या मुळे कायदा व सुव्यवस्था बिघडण्यसाची शक्यता आहे. यास म.जि.प्रा., जि.प. व विद्युत वितरण कंपनी जबाबदार आहे. ३ एच.पी. व ५ एच. पी. कनेक्शन शेतकऱ्यांचे पैसे भरून सुध्दा अध्याप विज कनेक्शन जोडलेले नाही.

**उप कार्यकारी अभियंता (विज वितरण कंपनी):-** मिटर उपलब्ध नाहीत व एच.पी. वर कनेक्शन देता येत नाही.

**मा.अरुणराव इंगवले :-** माझ्याकडे एच.पी.वर कनेक्शन आहे.

**उप कार्यकारी अभियंता (विज वितरण कंपनी ):-** सध्या मिटरवरच कनेक्शन दिले जातात.

**मा.अध्यक्ष:-** पाणी पुरवठा खंडीत आहे हा विषय गंभीर आहे यावर तात्काळ कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

**मा.राहुल आवाडे:-** विद्युत वितरण कंपनी कडून ग्रामपंचायतहद्दीत पोल उभारले बाबत ग्रामपंचायतीने त्यांच्याकडून भाडे आकारणी केली पाहीजे.

**मा.अरुणराव इंगवले :-** या प्रादेशिक योजने मधिल १४ गावांची पाणीपट्टी न भरलेने हि परिस्थिती उद्‌भवली आहे. हि रक्कम ३ कोटी ५ लक्ष असून या १४ गावांची रक्कम आळते, मजले व तिळवणी या तिन गावांवर आलेली आहे. या बाबत कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पू.) यांनी माहिती दयावी.

**कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पू.):-** या बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागाकडे पत्र व्यवहार सुरू आहे. या प्रादेशिक योजनेमधुन आळते, मजले व तिळवणी या तिन गावांना पाणी पुरवठा करणेत येतो. हि योजना कालबाहय झाल्याने व देखभाल दुरूस्तीचा खर्च वाढलेने तोटयात आहेत.

**मा.राहुल आवाडे:-** या योजनेवर नवीन कनेक्शन दयायाला नको पाहीजेत.

**मा.अरुणराव इंगवले :-** म.जि.प्रा.चे अधिकारी दिशाभुल करतात दोन वर्षापूर्वी पैसे भरून देखिल कनेक्शन दिलेले नाही. यावर्षी हातकणंगले, शिरोळ व गडहिंग्लज या तिन तालुक्यात अत्यंत कमी पाऊस झालेला आहे. १२ ते १३ बंधारे असताना देखिल बोअर, विहिरींना पाणी नाही तरी या तालुक्यात दुष्काळ जाहीर करावा.

यांनतर कृषि अधिकारी यांनी जिल्हयामधिल सर्व तालुक्यात आज अखेर झालेले पर्जन्यमान याची संख्यात्मक माहिती सभागृहास वाचून दाखविली व या तिन तालुक्यात पर्जन्यमान कमी झालेचे स्पष्ट झाले.

**मा.अरुणराव इंगवले** :- या तीन तालुक्यात पाऊस नाही हे तीन तालुके आवर्षनग्रस्त जाहीर करावेत. हातकणंगले तालुक्यात पाणी पुरवठा विभागात शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता पदे रिक्त आहेत सदर पदे तात्काळ भरणेत यावीत.

**कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पू.):-** रिक्त पदे भरणेची कार्यवाही तात्काळ करीत आहोत.

**मा.राजवर्धन नाईक - निंबाळकर:-** शिरोळ तालुक्याकडील पाणी पुरवठा विभागाकडील उप अभियंता व शाखा अभियंता यांच्या कामकाजा बाबत तक्रारी वाढत आहेत. तेथिल तक्रारी शाखा अभियंता बघतात या बाबतीत करणेत आलेल्या तक्रारी व त्या अन्वये केलेले निराकरण याची तारीख निहाय माहिती उपलब्ध करावी. येथे जलव्यवस्थापन ठरावाला किमंत दिली जात नाही. परस्पर व जाणीव पुर्वक निर्णय घेतले जातात. गट विकास अधिकारी व उप अभियंता यांच्यास्तरावर हि प्रकरणे सोयी प्रमाणे हाताळली जातात याचा खुलासा व्हावा.

**मा.अरुणराव इंगवले** :- मा.अध्यक्ष यांनी या बाबत लक्ष घालावे.

**मा.अध्यक्षः-** या बाबत मला काहीही कल्पना दिलेली नाही.

**मा.अरुणराव इंगवले** :- आरोग्य व बांधकाम विभागात निनावी तक्रारी, सदिंग्ध तक्रारी बाबत त्वरीत कार्यवाही केली जाते हे योग्य नाही.

**मा.राहुल आवाडेः-** हातकणंगले तालुक्यातील हुपरी , रेंदाळ व यळगुड इ. गावांतील शाळांमध्ये इ.७ वी च्या वर्गातील विदयार्थ्यांना पुस्तके उपलब्ध झालेली नाहीत तरी देखिल सदर शाळांनी परिक्षा घेतली आहे. सर्वांना पुस्तके तातडीने उपलब्ध झाली पाहजेत.

**मा.सभापती (शिक्षण):-** शासनस्तरावर प्राधान्याने मुदतीत पुस्तक छपाईची कार्यवाही झाली पाहीजे.

**मा.सभापती (समाजकल्याण):-** वैयक्तीक लाभाच्या योजनेत तलाठयांच्या स्वाक्षरीचा उत्पन्नाचा दाखला ग्राहय मानला पाहीजे. अन्य अधिकारी यांचा दाखला मिळविणेस संबधित लाथार्थ्यांला नाहक त्रास होतो.

**मा.अरुणराव इंगवले** :- वैयक्तीक लाभाच्या योजने बाबत तलाठयाचा दाखला ग्राहय धरणेकामी निर्णय घेउया.

**मा.समाजकल्याण अधिकारी :-** तसे करता येणार नाही तहसिलदारांचा दाखला घेणे अनिवार्य आहे.

**मा.उपाध्यक्षः-** तुम्ही या बाबत तलाठयांच्या स्वाक्षरीचा उत्पन्नाचा दाखला ग्राहय मानावा व आवश्यकता असल्यास या बाबत संबधित लाभार्थ्यांकडून तसे प्रतिज्ञापत्र घ्यावे परंतू अन्य वरिष्ठ अधिकारी यांच्या स्वाक्षरीचा दाखला आवश्यक अशी अट रद्द करावी.

**सचिवः-** जिल्हा परिषद कोल्हापूर कडे नव्याने तीन अधिकारी रुजू झाले आहेत त्यांचे सभागृहाच्या वतीने स्वागत करूया.

या नंतर श्री.किरण लोहार, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), श्री.राहुल कदम, (उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी) व श्री.यु.एम.थोरात, उप अभियंता (यांत्रिकी) यांचे मा.अध्यक्ष व मा. पदाधिकारी व मा. सदस्य यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

**मा.अध्यक्षः-** आजच्या स्थायी समिती सभेस मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, सचिव तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा आरोग्य अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) इत्यादी बरेच अधिकारी उपस्थित नाहीत या मुळे सभेमध्ये महत्वाचे व धोरणात्मक निर्णय घेणे शक्य होणार नाही सबब या

कारणास्तव आजची सभा तहकुब करून हि तहकुब सभा मंगळवार दिनांक ०५/०९/२०१७ इ.रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बोलविणेत येत आहे.

तद्नंतर सभेमध्ये आयत्यावेळचे विषय दाखल करुन घेऊन सभा तहकूब करणेत आली.

कार्यवृत्तांत वाचला आणि कायम केला दिनांक ०१/०९/२०१७

**( एस.वाय.देसाई)**
**सचिव तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**(शौमिका महाडिक)**
**सभापती स्थायी समिती तथा**
**अध्यक्ष**
**जिल्हा परिषद,कोल्हापूर**